# पाणी व स्वच्छता विभाग

## माहीती

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव** | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पंचायत समिती, जव्हार |
| **विभाग प्रमुखाचे पदनाम** | गट विकास अधिकारी |
| **विभागाचा ईमेल** | |

गट विकास अधिकारी

विस्तार अधिकारी (पंचायत)

तालुका पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

जव्हार

------------

गटसमन्वयक

---

समूह समन्वयक

**शासन निर्णय :**

1) केंद्र शासन- पेय जल एवं स्वच्छता मंत्रालय : डब्ल्यू-११०१३/१६/२०१४, दिनांक - १८ डिसेंबर २०१४
2) शासन परिपत्रक क्रमांक : जस्वप्र-०२१४/प्र.क्र.३४/पापु-११, दिनांक - १७ फेब्रुवारी २०१४
3) शासन परिपत्रक क्रमांक : सीएसआर-२०१४/प्र.क्र.२८/पापु-०८, दिनांक - १९ नोव्हेंबर २०१४
4) शासन परिपत्रक क्रमांक : स्वभामि-२०१५/प्रक्र.०५ पापु-०८, दिनांक - १३ जानेवारी २०१५
5) शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापाधो -१११५/प्र.क्र.२३/पापु-०७, दिनांक - ३ मार्च २०१५
6) शासन परिपत्रक क्रमांक : स्वभामि-१२१४/प्र.क्र.७४/पापु-१६, दिनांक - १२ डिसेंबर २०१५
7) शासन परिपत्रक क्रमांक : संगाग्रा-२०१६/प्र.क्र.७२/पापु-०८, दिनांक - ०४ जुन २०१६

**कामे** :

१) **“स्वच्छ भारत मिशन”** ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.
२) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत **‘वैयक्तिक शौचालय’** योजनेचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे.
३) पाण्याच्या गुणवत्तेसाठी मार्गदर्शन करून पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी करून त्या अहवालांची तपासणी करून ग्रामपंचायतींना चंदेरी, हिरवे, पिवळे, लाल कार्ड वितरीत करणे.
४) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत **“स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय”** अभियान राबवणे.
५) घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजनाची प्रभावीपणे राबवणे.

**उद्दिष्टे** :

१) मार्च २०१७ पर्यंत पालघर जिल्हा हागणदारी मुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट पाणी व स्वच्छता विभागाने साध्य करण्याचे ठरवले आहे.
२) पालघर जिल्हा हागणदारी मुक्त होणारा राज्यातील ‘पहिला पेसा जिल्हा’ ठरावा असे उद्दिष्ट आहे.
३) पालघर जिल्हा हागणदारी मुक्त करण्यासाठी जिल्ह्यामध्ये सन २०१६-२०१७ या वर्षामध्ये १,०४,९०६ वैयक्तिक शौचालाये बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
४) शौचालयाबरोबरच योग्य गुणवत्तेच्या पाण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींना पाणी गुणवत्तेसंबंधी हिरवे कार्ड असेल अशा प्रकारचे काम करण्याचे उद्दिष्ट विभागाने ठरवले आहे.
५) वैयक्तिक शौचालया बरोबरच सर्व सार्वजनिक ठिकाणी महिला व पुरुषासाठी वेगवेगळी शौचालये असतील असे उद्दिष्ट आहे.
६) जिल्ह्यातील सर्व शाळा व विद्यालये या मध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी वेगवेगळी शौचालये असतील अशाप्रकारचे उद्दिष्ट ठरवले आहे.

**कार्यशाळा** :

1) जिल्हा परिषद पालघर आयोजित **“समुदाय संचालित हागणदारी निर्मुलन कृती आराखडा नियोजन, प्रक्रिया व प्रशिक्षण”**ना चे आयोजन दिनांक - 16 जुन २०१६ रोजी करण्यात आले.
2) जिल्हा परिषद पालघर आयोजित **“पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यशाळा” चे आयोजन दिनांक - २४ जुन २०१६ रोजी करण्यात आले होते.**
**3) जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये “तालुकास्तरीय पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यशाळा” चे आयोजन माहे - जुन अखेर करण्यात आले होते.**
**4) जिल्हा परिषद पालघर व युनिसेफ यांचे संयुक्त विद्यमाने “स्वच्छता व सुरक्षितता कार्यशाळा” चे आयोजन दिनांक - १८ जुलै २०१६ रोजी करण्यात आले होते.**